Maharashtra University of Health Sciences, Nashik

# Physiotherapy Faculty

Trust Deed / Bylaws / Registration Certificate

Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | Shree Anant Smriti Charitable trust, Kasal |
| Registration Certificate | | Trust / Society :- E-299/Sindhudurg<br><br>Hospital (Bombay Nursing Act) :- |
| Name of the College / Institute<br>(As per First Affiliation letter) | : | Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal's,<br>INSTITUTE OF PHYSIOTHERAPY, KASAL |
| Address | : | Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal's,<br>INSTITUTE OF PHYSIOTHERAPY, KASAL<br>At Post Kasal, Taluka- Kudal, District- Sindhudurg<br>State- Maharashtra, PIN Code- 416603 |
| Email ID | : | iopkasal@gmail.com |
| Telephone / Mobile No.(s) | : | 9356214405 |
| Website | : | www.iopkasal.org |
| College Code | : | 161125 |

SASCTK's, INSTITUTE OF PHYSIOTHERAPY ★ KASAL ★ KUDAL SINDHUDURG

PRINCIPAL

SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal

Taluka Kudal, District- Sindhudurg

English Translation Copy of Registration Certificate of Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal.

No.001

# Certificate of Registration

It is hereby certified that the Public Trust described below has this day been duly registered under the **Mumbai Public Trust Act, 1950 (Mum.29 of 1950)** ,at the Public Trust Registration Office **Sindhudurg Region Sindhudurg .**

Name of the Public Trust :- **Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal, Tal. - Kudal, Dist.- Sindhudurg.**

Number in the Register of Public Trust :- **E-299/Sindhudurg.**

Certificate issued to :- **Mr. Chirag Shambhu Bandekar.**

Given under my hand , this 9th day of **June 2006**

Seal

Signature

Designation
Asst Charity Commr
Sindhudurg Area
Sindhudurg

TRUE TRANSLATION
12/3/15
UMESH SURESH SAWANT
NOTARY

NOTARY
UMESH SURESH SAWANT
SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD. NO.5524
GOVT. OF INDIA

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

सत्यमेव जयते

## नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) या अन्वये सिंधुदुर्ग विभाग सिंधुदुर्ग येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव : श्री. अनंत स्मृती चॅरीटेबल ट्रस्ट, कसाल, ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ई-२८८/सिंधुदुर्ग यांस प्रमाणपत्र दिले. श्री. चीराग शंभु बांदेकर

आज दिनांक ८/८/२००६ १९९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
सिंधुदुर्ग विभाग सिंधुदुर्ग
पदनाम

PRINCIPAL
...'s, Institute of Physiotherapy, Kasal
...uka Kudal, District- Sindhudurg

नक्कलेसाठी अर्ज आल्याची तारीख 01/09/2021
नक्कल तयार झालेची तारीख
नक्कल दिलेची तारीख } 02/09/2021

29/9/2021
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

१ चौकशी अर्ज क्र. ११/२०२१
न्यायनिर्णय

दाखल दिनांक : ३०.०८.२०२१
नोंदणी दिनांक : ३०.०८.२०२१
निकाल दिनांक : ०२.०९.२०२१
कालावधी : व. म. दि.
००. ००. ०३

## साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग यांचे समोर

(पीठासीन अधिकारी एम. एस. निकम)

चौकशी अर्ज क्र. ११/२०२१
नि. २१

१) श्री. चिराग शंभू बांदेकर
वय वर्षे ४०, व्यवसाय– व्यापार व शेती
रा. घर नं. १५५ब, एस. टी. स्टॅंड समोर,
मु. पो. कसाल, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग, पिन – ४१६६०३

२) श्री. तुकाराम यशवंत साळुंखे
वय वर्षे ६७, व्यवसाय– सेवानिवृत्त व शेती
रा. ५५७अ, कसाल हायस्कूल समोर,
मुं. पो. कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग,

........ अर्जदार

३) श्री. विठ्ठल गोपाळ सोनवडेकर
वय वर्षे ६५, व्यवसाय– सेवानिवृत्त व शेती
रा. सांद्रेवाडी, पोखरण, घर नं. ६२८,
कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग,

४) श्री. गोपाळ तातोबा हरमलकर
वय वर्षे ४१, व्यवसाय– नोकरी व शेती
रा. कुंभारवाडी, कसाल, घर.नं. ६४३,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

५) श्री. सचिन सुर्यकांत परब
वय वर्षे ४२, व्यवसाय– व्यापार व शेती

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

ग. १११६, दत्तराज हौसिंग सोसायटी, ........ अर्जदार
ओरोस, खर्येवाडी, ओरोस बुद्रुक,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन – ४१६८१२

विरूध्द

कोणी नाही ........ सामनेवाला

अर्जदारांर्फे अधिवक्ता : श्री. पी. पी. कदम

## न्यायनिर्णय

(दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहीर)

प्रस्तुतचा अर्ज श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग नोंदणी क्र. ई – २९९/(सिंधुदुर्ग) यां न्यासाची महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाचे कलम ५०अ (१) अन्वये योजना करण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जदाराची केस पुढीलप्रमाणे :–

२. अर्जदारांची नावे, व्यवसाय व पत्ते, न्यासाचे नाव, पत्ता व नोंदणी क्रमांक, न्यासाच्या मालमत्तेचे वर्णन, न्यासाचे वार्षिक उत्पन्न, विश्वस्तांची नावे व पत्ते, न्यासाचे उद्देश इत्यादींची माहिती अर्जाचे परिच्छेद क्र. २(अ), (ब), (क), (ड) व (इ) मध्ये नमुद केली आहे. अर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, ते न्यासाचे विश्वस्त व हितकर्ते आहेत. सदर न्यासाची स्थापना व नोंदणी सन २००६ मध्ये झालेली आहे. न्यासाचे उद्देश शैक्षणिक, सामाजिक स्वरुपाचे असल्यामुळे सदर न्यासामार्फत इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग, विद्यानिकेतन इंग्रजी माध्यम शाळा, वसतीगृह, कॅन्टीन इ. शैक्षणिक, उपक्रम सुरु केले आहेत. न्यासाचे सध्याचे उद्देश त्रोटक असल्यामुळे आणि न्यासाचे उत्पन्न आयकर विभागाकडून करमाफीसाठी पात्र होण्याकरीता काही तरतुदींचा समावेश करणे तसेच न्यासामार्फत नर्सिंग कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी हॉस्पीटल संलग्न करणे व शासनाच्या धोरणानुसार सदर संलग्न हॉस्पीटलचे व्यवस्थापनामध्ये मुख्य अथवा अन्य सदस्यांचा

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District Sindhudurg

विश्वस्त मंडळामध्ये स्विकृत विश्वस्त म्हणून समावेश करणे आवश्यक आहे. न्यास नोंदविताना न्यासाचे उत्तम व्यवस्थापनेसाठी विश्वस्तनिधीपत्रातील अन्य काही तरतुदींमध्ये बदल करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे सदर न्यासाला योजना लागू करण्याबाबतचा ठराव करण्यात आलेला आहे. सदर न्यासाचे दैनंदिन कामकाज सुव्यवस्थित चालविणे न्यासाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. न्यासाला योजना लागू केल्यास न्यासाचे व्यवस्थापनेच्या दृष्टीने तसेच सध्याचे वर्तमान व भविष्याच्या दृष्टीने व न्यासाचे दैनंदिन व्यवस्थापन सुरळीतपणे पार पाडण्यास मदत होऊन न्यासाचे तसेच विद्यार्थ्यांचे हित साधले जाणार आहे. वरील सर्व मुद्यांचा विचार करुन सोबत सादर केलेला योजना मसुदा मंजूर करावा अशी विनंती अर्जदारांनी केली आहे.

३. या कार्यालयातील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांचे नोंदणी पुस्तक पाहीले असता, त्यातील सदर न्यासाचा नोंदणी क्र. ई–२९९/सिंधुदुर्ग नुसार चौकशी अर्ज क्र. २३४/२००६, चौकशी अर्ज क्र. ३३०/२००८, चौकशी अर्ज क्र. ५३५/२०१०, चौकशी अर्ज क्र. ५३६/२०१० व चौकशी अर्ज क्र. २७०/२०१४ या नोंदीनुसार न्यासाचे पहिले व नंतरचे विश्वस्त मंडळ हे पाच जणांचे असल्याची नोंद केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात एकूण ०५ अर्जदार आहेत. हेच अर्जदार न्यासाचे विश्वस्त देखील आहेत. सदर सर्व अर्जदारांनी योजना अर्ज चौकशीची नोटीस काढण्याची आवश्यकता नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहेत. तसेच अर्जाच्या परिच्छेद क्र. ०७ खाली अर्जदार क्र. ०१ ते ०५ यांच्या सह्या आहेत. म्हणुन अर्जदार हेच विश्वस्त असल्यामुळे, विश्वस्तांना पुन्हा चौकशी नोटीस काढलेली नाही. प्रस्तावित योजना अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयात कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. याबाबत संबंधित वरिष्ठ लिपीकाकडून अहवाल मागविण्यात आला. त्यावर "सदर योजना अर्ज चौकशीकामी कोणाचीही हरकत / तक्रार आल्याचे आढळून आली नाही" असा अहवाल संबंधित वरिष्ठ लिपीकानी नि. ०१ वर नमुद केला आहे. त्यामुळे सदरचे प्रकरण पूर्णपणे विना आव्हानीत राहिले आहे.

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

६
२०४

४. अर्जदाराने पुढील कागदोपत्री पुरावा दिलेला आहे. प्रस्तावित योजना मसुदा (परिशिष्ट – अ) नि. ०२, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांचे नोंदणी पुस्तकाची सहीशिक्का नक्कल नि. ०५, न्यासाच्या विश्वस्तनिधीपत्रकाची सहीशिक्का नक्कल नि. ०६, दि. ०४.०८.२०२१ रोजीच्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या अजेंडयासोबत नोटीस बजावणी पुरावा नि. ०७, दि. ०४.०८.२०२१ रोजीच्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्ताची पडताळणी प्रत नि. ०८, विश्वस्तांची संमतीपत्रे नि. ०९ ते नि. १३, न्यासास योजना करण्यास संमती असल्याबाबत सर्व विश्वस्तांची मे. नोटरी पब्लिक कणकवली यांचेसमोर केलेली प्रतिज्ञापत्रे अनुक्रमे नि. १४ ते नि. १८, श्री. चिराग शंभू वांदेकर यांचे सरतपासाचे शपथपत्र नि. १९ व पुरावा बंद पुरसीस नि. २० असा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

५. अर्जदारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे निर्णयाकरीता उपस्थित झाले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे :

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | न्यासाच्या सुव्यवस्थेकरिता योजना करणे आवश्यक अगर योग्य आहे काय? | ... होय. |
| २) | जर होय तर योजना काय? | ... परिशिष्ट–'अ' प्रमाणे |
| ३) | आदेश काय? | ... अंतीम आदेशानुसार. |

## कारणमीमांसा

मुद्दा क्र. ०१ :–

६. या कार्यालयातील अभिलेख वाचला असता असे दिसते की, सदरचा न्यास विश्वस्तनिधीपत्राद्वारे अस्तित्वात आलेला आहे. सध्या विश्वस्तांना न्यासाच्या उद्देशात व नियमांमध्ये बदल करावयाचा आहे. विश्वस्तनिधीपत्रक हा एक खाजगी दस्तऐवज आहे. त्यामुळे त्यामध्ये बदल करता येणार नाही. म्हणुन न्यासाकरीता नवीन योजना तयार करण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नाही. अर्जाच्या कथनाच्या

२.९.२१

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District Sindhudurg

पृष्ठयार्थ श्री. चिराग शंभू बांदेकर यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र नि. १९ अन्वये अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदाराने केलेल्या पुराव्याला कोणीही आव्हान दिलेले नाही. म्हणुन न्यासाचा कारभार व व्यवस्थापन सुस्थितीत चालण्यासाठी न्यासाला सर्व समावेशक योजना तयार करणे आवश्यक आहे या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष होकारार्थी दिला आहे.

मुद्दा क्र. ०२ :—

७. अर्जदारांनी योजना अर्जासोबत योजना मसुदा दिला आहे. तथापि, योजना मसुदा आहे तसा स्विकारता येणार नाही. काही तरतुदींमधील वाक्यरचनेत बदल करणे आवश्यक आहे. सदरचा बदल थेट योजनेमध्ये समाविष्ट केलेला आहे कारण किरकोळ स्वरुपाच्या बदलास विश्लेषणाची आवश्यकता नाही. प्रस्तावित योजनेत न्यासाची मिळकत, मिळकतीचा ताबा, विश्वस्त मंडळाची सभा व मागणीची सभा, विश्वस्त मंडळाचे कार्य आणि अधिकार, न्यासाचा निधी व विनियोग, इत्यादी बाबतचे नियम खुप त्रोटक आहेत. त्यामुळे सर्व समावेशक नियम थेट योजनेमध्ये समाविष्ट करत आहे. प्रस्तावित योजनेत सभासदत्व व त्यांची पात्रता, सभासद यादी नोंदवही, सभा नोटीस वही व सभा वृत्तांत नोंदवही (मिनिट बुक), महत्वाची कागदपत्रे याबाबत कोणतीही तरतुद समाविष्ट नाही. त्यामुळे सर्व समावेशक नियम थेट योजनेमध्ये समाविष्ट करत आहे. अशा रीतीने, योजना म्हणजे परिशिष्ट 'अ' तयार केलेली आहे व ती योजना न्यासाची योजना असल्याचे जाहीर करण्यात आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ०२ चा निष्कर्ष होकारार्थी दिला आहे.

मुद्दा क्र. ०३ :—

८. मी मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष होकारार्थी दिलेला आहे. त्यामुळे आलेला नैसर्गिक परिणाम म्हणजे योजना अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. ०३ च्या निष्कर्षापोटी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. योजना अर्ज मंजूर केला.

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

२. न्यासाच्या सुव्यवस्थापनेसाठी या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट – 'अ' मधील योजना मंजूर केली. सदरचे परिशिष्ट – 'अ' या आदेशाचा भाग समजण्यात यावा.

३. या आदेशाची नोंद सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांचे नोंदणी पुस्तक (परिशिष्ट १) यामध्ये घेण्यात यावी.

2.9.२०५

(एम. एस. निकम)
साहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

ठिकाण : सिंधुदुर्गनगरी
दिनांक : ०२.०९.२०२१

साहाय्यक धर्मादाय ... सिंधुदुर्ग

PRINCIPAL
SASCTK's. Institute of Physiotherapy. Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

# परिशिष्ट — 'अ'

**१) न्यासाचे नाव, नोंदणी क्रमांक व कार्यालय:—**

या न्यासाचे नाव "श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल" असे राहील. या सार्वजनिक न्यासाची नोंदणी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे ई — २९९/(सिंधुदुर्ग) या क्रमांकाने झालेली आहे. या न्यासाचे कार्यालय द्वारा. श्री. शंभू अनंत बांदेकर, घर नं. १५५अ, नवा बाजार, मु. पो. कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र राज्य, पिन — ४१६६०३ येथे राहील.

**२) कार्यक्षेत्र :—**

या न्यासाचे कार्यक्षेत्र भारत देश राहील.

**३) न्यासाचे हिशोबाचे वर्ष :—**

न्यासाचे हिशोबाचे वर्ष ०१ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

**४) न्यासाची मिळकत :—**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकावर ज्या स्थावर व जंगम मिळकतींची नोंद आहे, त्या मिळकती न्यासाच्या मिळकती राहतील. शिवाय नजरचुकीने मिळकतींच्या नोंदी, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांचे नोंदणी पुस्तकावर नोंद करावयाच्या राहील्या असतील तर अशा सर्व मिळकती त्याबाबत चौकशी झाल्यानंतर योग्य त्या पुराव्याअंती न्यासाच्या मालकीच्या होतील. तसेच, न्यासाने खरेदी केलेली, संपादित केलेली, देणगी, बक्षीस रुपाने, रोख रक्कम, स्थावर- जंगम मालमत्ता अगर अन्य कायदेशीर मार्गाने मिळणाऱ्या सर्व मिळकती या सर्वांना न्यासाची मिळकत म्हणून संबोधण्यात येईल.

**५) न्यासाच्या मिळकतींचा ताबा :—**

न्यासाच्या सर्व मिळकती व यानंतर सामील होणाऱ्या मिळकती या योजनेतील तरतुदीप्रमाणे व त्यास बाधा न येता हल्लीचे विश्वस्त व नवीन नेमल्या

उ/ २९.८

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

जाणाऱ्या विश्वस्तांचे अधिकारात ते विश्वस्त असे पर्यंत राहतील व ते त्याबाबतची व्यवस्था, देखरेख, खरेदी, विक्री वगैरे व्यवहार या योजनेतील तरतुदीप्रमाणे आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम मधील तरतुदींना अनुसरुन करतील. या सर्व मिळकतीचा विनियोग योजनेमध्ये नमूद केलेल्या उद्देशांवर करणेचा अधिकार योजनेतील विश्वस्त मंडळास राहील.

६) न्यासाचे उद्देश :–

(१) लोकांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण व्हावी यासाठी जनजागृतीचे विविध उपक्रम राबविणे, रक्तदान तसेच आरोग्यविषयक शिबीरे भरविणे.

(२) फिरते रुग्णालय, रुग्णवाहिका सुरु करुन गरजुंना मदत करणे.

(३) सर्व सोयीनीयुक्त व्यायामशाळा, ग्रंथालय, वाचनालय सुरु करणे व चालविणे.

(४) विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्टया आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविणे.

(५) वैद्यकीय अभ्यासक्रम तसेच पॅरावैद्यकीय महाविद्यालये अभ्यासक्रम उदा. ॲलोपॅथी, नर्सिंग, होमिओपॅथी, आयुर्वेदिक, डेंटल कॉलेज हे कोर्सेस सुरु करणे.

(६) डी–फार्म, बी–फार्म, एम–फार्म, डी.एड्., बी.एड्, बी.पी.एड, कायदा शिक्षण, कृषी विद्यालये, वैद्यकीय, पशुवैद्यकीय, इंजिनिअरींग, टेक्निकल, पॉलिटेक्नीक, आय.टी.आय., फॅशन डिझायनिंग, इ. संबंधित कोर्सेस, कॉलेजेस, संस्था स्थापन करणे व चालविणे.

(७) मेडीकल निदान, मिनी हॉस्पिटल, पॉलिक्लिनिक फिरता दवाखाना, रुग्णवाहिका शहरी व ग्रामीण भागामध्ये सुरु करणे. रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी नर्सिंग होम चालविणे, विशेष रुग्णांसाठी ओ.पी.डी. विभाग सुरु करणे.

(८) रोग व रक्तनिदान केंद्र, ब्लड बॅक, पॅथॉलॉजी लॅब, हॉस्पिटल, रिसर्च सेंटर, न्यायवैद्यक लॅब सुरु करणे, त्या अनुषंगाने रुग्णांना सेवा

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

उपलब्ध करुन देणे.

(९) वैद्यकीय सेवेतील विविध कोर्सेसचे शिक्षण उदा. क्ष—किरण, नर्सिंग क्लिनिक, फार्मसी डिग्री डिप्लोमा कोर्स सुरु करणे.,

(१०) एडस्, हिपॅटायटीस. बी, टी.बी., मलेरिया, कॉलरा, डेंगू, चिकन गुनिया तसेच लहान मुलांचे आजार या सारख्या होणाऱ्या रोगाविषयी व त्याचे निर्मुलनासाठी जनजागुती करणे. आयुर्वेद सेंटर, योग केंद्र, योग प्रचार, योग शिक्षण, नॅचरोपॅथी व अभ्यासक्रम सुरु करणे. त्या अनुषगाने महाविद्यालय सुरु करणे.

(११) पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेस उदा. एम.डी., एम.एस., डिप्लोमा कोर्सेस, डीएन.बी. कोर्सेस सुरु करणे व चालविणे.

(१२) भारतातील व भारताबाहेरील विद्यापीठांच्या/संस्थांच्या सहकार्याने निरनिराळे शैक्षणिक कोर्सेस सुरु करणे व चालविणे. त्याचप्रकारीने डीम्ड युनिव्हर्सिटी, अॅटॉनॉमस युनिव्हर्सिटी सुरु करणे.

(१३) भारत सरकार, भारतातील संघराज्य सरकार, राज्य सरकार यांचेसोबत मिळून तसेच आवश्यकतेनुसार त्यांची मान्यता घेऊन त्यांचेशी सहकार्याने विविध शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक उपक्रम, कार्यक्रम, अभ्यासक्रम सुरु करणे.

(१४) व्यायसायिकदृष्टया आवश्यक त्या संस्था, मराठी व इंग्रजी माध्यमातून बालवाडया, अंगणवाडया, आश्रमशाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा, उच्च महाविद्यालये, कला, वाणिज्य व शास्त्र शाखांची महाविद्यालये सुरु करणे व त्यांचे व्यवस्थापन पाहणे.

(१५) अनाथ मुलांसाठी अनाथालय, वृध्दांसाठी वृध्दाश्रम, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह स्थापन करुन त्याची सर्व सोयींनीयुक्त अशी बांधणी करुन शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी वापर करणे.

(१६) पर्यटन विकासास चालना देणारे उपक्रम राबविणे, त्यासाठी आवश्यकता असल्यास विश्रामगृहे, हॉटेल्स, रिसॉटस्, गोल्ड्या सुरु करणे व चालविणे तसेच हॉटेल मॅनेजमेंट, कॅटरींग, टूरिझम मॅनेजमेंट

2.4.2024

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

इ. कोर्सेस सुरु करणे.

(१७) जिराईत, बागाईत, पडीक जमीन विकसित करणे आणि त्यांची खरेदी व विक्री करणे, पाणलोट क्षेत्र विकास करणे, खते, बी—बियाणे, फवारणी औषधे इ. विषयी संशोधन करणे. त्यासाठी आवश्यक त्या प्रयोगशाळा उभारणे व त्याचा जनतेस पुरवठा करणे.

(१८) विविध सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणे.

(१९) कॉम्प्युटरचे नवनवीन कोर्सेस, अभ्यासक्रम सुरु करणे व प्रशिक्षण देणे.

(२०) साहित्य, कला, संगीत, नृत्य, नाटय, वक्तृत्व आदी कलांचे प्रशिक्षण देणे, त्यांचे कार्यक्रम आयोजित करणे, स्पर्धा आयोजित करणे. याबरोबरच साहित्य संमेलने, कवी संमेलने, नाटय संमेलने तसेच इतर संमेलने आयोजित करणे, विविध छंद वर्गांचे आयोजन करणे.

(२१) सांस्कृतिक भवनांची उभारणी करुन ती अल्प मोबदल्यात जनतेस उपलब्ध करुन देणे.

(२२) समान उद्देश असणाऱ्या इतर धर्मादाय संस्थांना सर्व प्रकारे मदत करणे.

(२३) समाजातील निराधार व्यक्तींना आधार देण्यासाठी आधार केंद्र स्थापन करुन शासनाचा सहयोग प्राप्त करुन घेऊन त्यांच्या भोजनाची व निवासाची व्यवस्था करणे, या न्यासाच्या माध्यमातून विविध स्वरुपाचे व्यक्ती विकास कार्यक्रम, योगसाधना, सांस्कृतिक, क्रिडा, आध्यात्मिक स्वरुपाची शिबीरे आयोजित करणे, वृध्दांच्या मनात परमेश्वर भक्तीची ओढ निर्माण करुन त्यातून त्यांचे मानसिक संतुलन स्थिर राहील अशा कार्यक्रमाचे आयोजन करणे.

(२४) न्यासाच्या माध्यमातून समाजामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, सर्वसामान्य लोकांना विविध क्षेत्रातील माहिती प्राप्त व्हावी यासाठी अनेक ठिकाणी आवश्यकतेनुसार वाचनालय/ग्रंथालय सुरु करणे, त्यासाठी शैक्षणिक, सामाजिक परिवर्तनीय अशा पुस्तकांचा संग्रह करणे, प्रौढ शिक्षणाचा प्रसार करणे.

PRINCIPAL
SASC... Kasal
SASG... stitut... Kasal
Talu... Distric... g

(२५) शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे, त्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमधून प्ले—ग्रुप, नर्सरी, मॉन्टेसरी, बालवाडी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक, तंत्रशिक्षण, उच्च माध्यमिक, वैद्यकीय महाविद्यालय तसेच आश्रमशाळा, अंध—अपंग शाळा, मुकबधीर, कर्णबधीर, मतिमंद मुलांची शाळा, वस्तीशाळा, रात्रशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना, सावित्रीबाई फुले दत्तक योजना, इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची विशेष प्रचार, मॉन्टेसरी टिचर ट्रेनिंग कोर्स, कृषी महाविद्यालय, कायदे विषयक महाविद्यालय, तांत्रिक महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालय, अध्यापक महाविद्यालय, (प्रि—प्रायमरी ट्रेनिंग, डी.एड्., बी.एड्., बी.पी.एड्, बी. एड्. फिजिकल) सीईटी प्रशिक्षण केंद्र, सर्व प्रकारचे प्रशिक्षण वर्ग इ. स्थापन करुन चालविणे.

(२६) विद्यार्थ्यांना शैक्षणिक शाखेतील सर्व कोर्सेस माहिती व मार्गदर्शन करणेसाठी फाईन आर्ट, जसे संगीत, नृत्य, नाटय, पेंटिंग ड्राईंग, नक्षीकाम, अम्ब्रॉयडरी, टेलरींग, हस्तकला, लघुउद्योग व गृहोद्योग, मार्केटींग व्यवस्थापन, सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर तंत्रज्ञान आणि डिप्लोमा कोर्सेस इ. विषयक प्रशिक्षण वर्ग स्थापन करुन चालविणे.

(२७) आदिवासी व दुर्गम भाग हा शैक्षणिकदृष्टया मागासलेला असल्याने तेथील मुलामुलींच्या साक्षरतेमध्ये वाढ व्हावी या दृष्टीकोनातून न्यासामार्फत साक्षरता वर्ग, वस्तीशाळा, सर्व शिक्षा अभियान इ. सारख्या शासकीय योजना राबविण्याचा प्रयत्न करणे.

(२८) न्यासाच्या सर्व शैक्षणिक संस्थेमध्ये भारतातील सर्व जाती, धर्म, सांप्रदाय, पंत विविध भाषिक तसेच सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. तसेच न्यासाच्या इतर उपक्रमामध्ये म्हणजे आरोग्य, शिक्षण, कला, क्रिडा या सर्व उपक्रमामध्ये समाजातील सर्व जाती, धर्म, सांप्रदाय, पंत विविध भाषिक तसेच सामाजिक पार्श्वभूमी असलेल्यांना सहभाग, प्रवेश, उपचार इ. सेवा उपलब्ध करुन दिल्या जातील.

2.9.24

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

वरीलप्रमाणे न्यासाचे उद्देश राहतील. सदरहू उद्देशांवर मुख्यत्वे करुन न्यासाच्या उत्पनचा विनियोग करण्यात येईल. तसेच विश्वस्त मंडळास योग्य वाटल्यास न्यासाचे उत्पन्न इतर सार्वजनिक हिताच्या कामांकरिता वापरणेची मुभा विश्वस्त मंडळास राहील.

७) सभासदत्व व त्यांची पात्रता :—

"श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल" या न्यासाची योजना मान्य असलेल्या भारतातील १८ वर्षावरील कोणाही स्त्री — पुरुष व्यक्तीला या न्यासाचे सभासद होता येईल. सभासद होऊ इच्छीणाऱ्या व्यक्तीने न्यासाकडील विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज विश्वस्त मंडळाकडे भरुन देणे आवश्यक आहे. विश्वस्त मंडळ अशा सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विश्वस्त मंडळाच्या सभेत बहुमताने निर्णय घेईल व अर्जदार व्यक्तीला सभासदत्व देणेत येईल.

८) सभासदांचे हक्क व सभासदत्व रद्द होणे :—

सभासदास न्यासाच्या कोणत्याही कामात सहभागी होता येईल. सभेला हजर राहून फक्त सभासदत्वाच्या कालावधीमध्येच मतदान करता येईल. न्यासाच्या कार्यासंबंधी विचारपूस व चर्चा करता येईल. न्यासाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन करता येईल.

खालील कारणावरुन विश्वस्तांचे विश्वस्त पद रद्द होईल.

अ. स्विकृत विश्वस्ताव्यतिरिक्त एखादा विश्वस्त न्यासाच्या सलग ०५ सभांना कोणतेही कारण न देता अथवा मुख्य विश्वस्तांची परवानगी न घेता गैरहजर राहिल्यास.

ब. राजीनामा दिल्यास, मृत्यू पावल्यास अथवा शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपात्र ठरल्यास

क. नादार अथवा चरित्रहिन ठरल्यास.

ड. फौजदारी अथवा नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्याखाली शिक्षा झालेस.

इ. न्यासाच्या हिताविरुध्द कोणतेही कृत्य केलेस अथवा न्यासाच्या हितास

PRINCIPAL
SASCT... Physiotherapy, Kasal
Tal... Sindhudurg

बाधा येईल असे कृत्य केलेस.

ई. कोणत्याही सदस्याने न्यासाच्या गुप्त गोष्टींची कोठेही वाच्यता करता कामा नये. या सर्व गोष्टी सभासदत्व रद्द होण्यास कारणीभूत ठरतील. वर नमुद कलम ०८ मध्ये नमुद केलेल्या कोणत्याही कारणाने रिकामी झालेली विश्वस्तांची जागा त्यांचे कायदेशीर वारस घेतील. जर कायदेशीर वारस अस्तित्वात नसतील तर त्याजागी मुख्य विश्वस्त नवीन विश्वस्तांची नियुक्ती करतील.

०९) न्यासाचे विश्वस्त मंडळातील रिक्त पद भरणेची तरतुदी :—

न्यासाच्या विश्वस्त मंडळाला, कोणत्याही विश्वस्ताला बहुमताने केव्हीही कमी करण्याचा अधिकार राहील. या व्यतिरिक्त मृत्यू, राजीनामा किंवा भारत देशाबाहेर न्यासाच्या विना परवानगी सतत ०६ महिने रहिवास, नैतिक अधि:पतनाच्या गुन्हयाखाली शिक्षा झाल्यास तसेच न्यासाचे हिताविरुध्द केलेल्या कृत्यामुळे विश्वस्त पद रद्द केलेस अशा कारणास्तव सदर रिक्त जागा न्यासाच्या विश्वस्त मंडळ सभेत बहुमताने भरण्यात येईल.

१०) न्यासाचे विश्वस्त मंडळ व त्यांचा कार्यकाळ :—

विश्वस्त मंडळातील विश्वस्तांची संख्या कमीत कमी ०३ व जास्तीत जास्त ११ लोकांचे राहील व विश्वस्त श्री. चिराग शंभू वांदेकर हे वंशपरंपरेने मुख्य विश्वस्त तथा अध्यक्ष राहतील. उर्वरीत सर्व विश्वस्त वंशपरंपरेने विश्वस्त म्हणून राहतील. त्यांच्या पश्चात त्यांच्या वारसांची विश्वस्त म्हणून नियुक्त करणे न्यासावर बंधनकारक राहील. जर कायदेशीर वारस अस्तित्वात नसतील किंवा एखाद्या विश्वस्ताने राजीनामा दिल्यास त्या जागी उर्वरीत विश्वस्त मंडळ बहुमताने नवीन विश्वस्तांची नियुक्ती करतील.

विश्वस्त मंडळामध्ये अध्यक्ष —१, उपाध्यक्ष —१, सचिव —१, सहसचिव — १, खजिनदार —१ असे पाच (०५) पदाधिकारी व इतर विश्वस्त हे सदस्य राहतील. न्यासाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार विश्वस्त मंडळ

2.9.2024

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

पदाधिकारी निवड करतील. नियुक्त होणारा पदाधिकारी त्या पदावर तहहयात राहील. काही कारणास्तव विश्वस्तास सदर पदावर काम करणेचे नसलेचे अथवा अन्य कारणाने सदर विश्वस्त त्या पदावर काम करणेस अपात्र ठरलेस उर्वरीत विश्वस्त त्या ठिकाणी बहुमताने नवीन पदाधिकारी निवड करतील. असे पद त्या विश्वस्ताकडे तहहयात राहील.

विश्वस्त मंडळातील पदाधिकाऱ्यांची संख्या वाढवण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास बहुमताने राहील. अध्यक्ष हे न्यासाचे तहहयात मुख्य विश्वस्त व अध्यक्ष राहतील. त्यांच्या पश्चात हे पद त्यांचे कायदेशीर वारस उपभोगतील. विश्वस्त मंडळामध्ये सेटलॉर – मुख्य विश्वस्त हे अध्यक्ष राहतील. न्यासाचे विश्वस्त मंडळामध्ये आवश्यकतेनुसार विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना स्विकृत विश्वस्त म्हणून नियुक्त करता येईल. अशाप्रकारे तज्ञ व्यक्तींना स्विकृत करता येईल. त्यांचा कालावधी विश्वस्त मंडळ नियुक्तीवेळी ठरवतील. विश्वस्त मंडळातील सदस्यांची नियुक्ती, सबळ कारणासाठी हकालपट्टी व राजीनामा मागणी इ. अधिकार विश्वस्त मंडळास बहुमताने राहतील.

११) <u>विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :–</u>

<u>अध्यक्ष :–</u>

(१) विश्वस्तांची नियुक्ती करणे, सबळ कारणासाठी हकालपट्टी करणे, त्यांचे राजीनामे स्विकारणे.

(२) न्यासाच्या अध्यक्षांनी न्यासाने बोलविलेल्या सभांचे अध्यक्षस्थान भूषवावे व नियंत्रण ठेवणे.

(३) सभेच्या तारखा, वेळ व जागा निश्चित करणे.

(४) सभेचे कामकाज सांभाळणे व कामकाजावर देखरेख ठेवणे.

(५) अनुकूल वा प्रतिकूल अशी सम समान मत विभागणी झाल्यास एक जादा निर्णायक मत (कास्टिंग व्होट) देणे.

(६) सचिव यांनी न्यासाचे कामकाज सुरळीत व नियमितपणे पार पाडले नाही तर स्वत:च्या अधिकारात न्यासाचे कामकाज पार पाडणे,

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

2.1.2024

विश्वस्त मंडळाच्या सभा स्वतःच्या अधिकारात बोलाविणे.

(७) सचिवांमार्फत मांडण्यात आलेले ठराव विश्वस्त मंडळाच्या सभेपुढे मुजंरीसाठी ठेवणे.

(८) न्यासाच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे.

(९) न्यास हितार्थ विविध करार करणे.

(१०) सभासदांचा राजीनामा मंजूर करणेबाबत अंतीम अधिकार अध्यक्षांना राहील.

<u>उपाध्यक्ष :—</u>

(१) न्यासाच्या अध्यक्षांच्या आदेशाचे पालन करणे.

(२) न्यासाच्या कार्यात अध्यक्षांना मदत करणे.

(३) अध्यक्षांच्या अनुपस्थित अध्यक्षांना असलेले सर्व अधिकार वापरुन न्यासहितार्थ न्यासाचे कामकाज चालविणे.

(४) अध्यक्षांच्या अनुपस्थितीत न्यासांच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषावणे व नियंत्रण ठेवणे.

<u>सचिव :—</u>

(१) अध्यक्षांच्या आदेशाचे पालन करणे.

(२) न्यासाच्या सर्व सभा, आयोजित करणे. तसेच सभा इतिवृत्त हे इतिवृत्त नोंदवहीमध्ये सुवाच्य अक्षरात सुस्पष्ट लिहावे व पुढील सभेत वाचून दाखवावे.

(३) अध्यक्षाच्या नावे अध्यक्षांच्या परवानगीने सर्व अधिकृत पत्रव्यवहार करावा.

(४) विविध कार्यसूची तयार करावी.

(५) न्यासाचे कोर्टकचेरीचे कामकाज पाहणे.

(६) विश्वस्त मंडळाच्या संमतीने किरकोळ नियम तयार करणे.

(७) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत न्यासाच्या सभांचे अध्यक्षपद स्विकारुन न्यास हितार्थ कामकाज चालवणे.

2.9.2024

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

(८) मासिक व वार्षिक जमाखर्च, पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, वर्गणीचे तपशिल आदी माहिती खजिनदाराकडून उपलब्ध करुन घेऊन ती विश्वस्त मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करणे.

(९) वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.

(१०) वार्षिक हिशेब तपासणी करुन घेणे.

(११) न्यासाच्या जमा खर्चाबाबत विश्वस्त मंडळास माहिती देणे.

(१२) वार्षिक हिशेब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करवून घेणे व संबंधित विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.

(१३) न्यासाच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

(१४) न्यासासाठी पत्रव्यवहार करणे व न्यासाचे दप्तर सांभाळणे.

(१५) विश्वस्त मंडळ व न्यासाचा नोकर वर्ग यांचा दुवा म्हणून काम करणे. नोकरवर्गाच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे व न्यासाचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पाहणे.

(१६) अध्यक्षांच्या परवानगीने विविध विभागातील कर्मचाऱ्यांची योग्य पध्दतीने विभागीय बदली करणे.

सहसचिव :–

(१) न्यासाच्या अध्यक्षांच्या व सचिवांच्या आदेशाचे पालन करणे.

(२) न्यासाच्या कार्यात सचिवांना मदत करणे.

(३) सचिवांच्या अनुपस्थितीत सचिवांना असलेले सर्व अधिकार वापरुन न्यासहितार्थ न्यासाचे कामकाज चालविणे.

खजिनदार :–

(१) न्यासाचा दैनंदिन, मासिक व वार्षिक जमा–खर्च ठेवणे.

(२) वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.

(३) वार्षिक हिशेब तपासणी करुन घेणे.

(४) देणगी, कर्ज, व्याज अगर येणे रक्कम जमा करुन खर्चाची मंजूर

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District Sindhudurg

झालेली बिले मुख्य विश्वस्त व विश्वस्त मंडळाच्या संमतीने संबंधितांना अदा करणे.

(५) हिशोब संबंधाच्या सर्व रेकॉर्डची जबाबदारी खजिनदारावर राहील.

(६) मासिक, वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन ते विश्वस्त मंडळाकडे सादर करणे.

(७) न्यासाने ठरविलेल्या बँकेत नियमितपणे जमा होणारी रक्कम जमा करणे व त्या अनुषंगाने येणारी कामे करणे.

(८) वार्षिक हिशेब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करवून घेणे व वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे, व संबंधित कार्यालयाकडे ऑडिट सादर करणे.

(९) न्यासाच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

विश्वस्त मंडळातील विश्वस्त :—

(१) पदाधिकाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामात मदत करणे.

(२) पदाधिकाऱ्यांच्या कामांची माहिती अवगत करुन घेणे.

(३) विश्वस्त मंडळाच्या सभांना नियमित हजर राहून ठराव मंजुरीला मान्यता देणे. तसेच ठरावावर मतदान घ्यावयाचे ठरल्यास मतदान करणे.

१२) विश्वस्त मंडळाची सभा व मागणीची सभा :—

(१) विश्वस्त मंडळाची सभा तीन महिन्यातून एकदा बोलाविण्यात येईल. न्यासाचे मुख्य विश्वस्त अशा सर्व सभांचे अध्यक्ष पद सांभाळतील. त्यांच्या गैरहजेरीत हजर विश्वस्त आपल्यापैकी कोणाचीही सभा अध्यक्ष म्हणून निवड करतील.

(२) विश्वस्त मंडळाच्या सभेची नोटीस विश्वस्त मंडळातील सर्व विश्वस्तांना सभेपूर्वी ०७ दिवस अगोदर देणेत येईल. तातडीच्या किंवा विशेष सभेवेळी ही मुदत २४ तासांची राहील. सभेचा नोटीस

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

विश्वस्तांच्या हाती किंवा यु.पी.सी. पोस्टाने देण्यात येईल. सचिवांनी अध्यक्षांच्या संमतीने वरील प्रमाणे सभेची सुचना देणे आवश्यक राहील. सदरची नोटीस विश्वस्तांना समक्ष देऊन नोटीस मिळाले बद्दलची त्यांची सही न्यासाकडील नोटीस बुकांत घेणेत येईल.

(३) विश्वस्त मंडळाच्या सभेसाठीचा कोरम, विश्वस्त मंडळाच्या एकूण विश्वस्त संख्येपैकी २/३ एवढा राहील. कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासाने बोलाविण्यात येईल व अशा सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही. सभेतील सर्व निर्णय मतदान करुन बहुमतांनी घेतले जातील. परंतु, सभा नोटीसमध्ये तशी सूचना लिहीणे आवश्यक आहे.

(४) न्यासाला खरोखर उपयोगी पडतील अशा व्यक्तींना विश्वस्त मंडळाच्या सभेस मुख्य विश्वस्तांच्या पूर्व परवानगीने निमंत्रित म्हणून बोलविता येईल. परंतु, त्यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही.

(५) विश्वस्त मंडळातील किमान ०४ विश्वस्तांनी मिळून विश्वस्त मंडळाच्या सभेची लेखी मागणी केल्यास, अध्यक्षांनी लेखी मागणी मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत मागणीप्रमाणे सभा बोलाविली पाहिजे. जर अध्यक्षांनी १५ दिवसांचे आत सभा बोलाविली नाही तर सभेची मागणी करणारे अन्य विश्वस्त, विश्वस्त मंडळाची सभा घेऊ शकतील. सदरची सभा न्यासाच्या कार्यालयात दिवसा बोलविता येईल. त्यावेळी या योजनेप्रमाणे सर्व नियम पाळणे बंधनकारक राहील.

(६) अती महत्वाच्या कामासाठी गरज पडल्यास अध्यक्ष तात्काळ (तातडीची) सभा बोलावू शकतील.

१३) विश्वस्त मंडळाचे कार्य आणि अधिकार :—

१) न्यासाचे दैनंदिन कामकाज पाहणे. नोकर वर्गाची नेमणूक करणे. सेवानिवृत्ती करणे. कामावरुन कमी करणे. न्यासाचे आर्थिक व्यवहार

Npalwai
PRINCIPAL
ASCT... Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

सांभाळणे. नवीन उपसमित्या नेमणे व त्यांचे कामकाज संपल्यानंतर त्या बरखास्त करणे, न्यासाच्या ध्येय धोरणांनुसार इतर कामे करणे.

२) हिशोब तपासनीसांकडून न्यासाचे जमाखर्च, ताळेबंद पत्रक तयार करुन घेऊन त्याबाबतचा अहवाल तयार करणे व तो न्यासाच्या विश्वस्त मंडळाच्या सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे. न्यासाचे हिशोब ट्रस्ट कायद्यातील तरतुदीस अनुसरुन ऑडिट करुन घेऊन विहीत नमुन्यामध्ये ते मे. साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांचेकडे दरवर्षी ठराविक मुदतीत सादर करणे.

३) न्यासाच्या कार्याची दिशा, नवीन कार्य, योजनेमध्ये दुरुस्ती असेल तर ती शिफारशीसह न्यासांच्या विश्वस्त मंडळाच्या सभेपुढे सादर करणे.

४) न्यासाच्या विश्वस्त मंडळाच्या सभेने मंजूर केलेले ठराव व आदेश तसेच धोरण विषयक गोष्टी योग्यरितीने अंमलात आणणे.

५) न्यासामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध शाखांबाबत नियम करणेचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील. तथापि, असे नियम प्रचलित कायद्याशी विसंगत नसावेत.

६) विश्वस्त मंडळाच्या कामकाजामध्ये तसेच सभेमध्ये एखादा विश्वस्त संयुक्तिकरित्या सहभागी. नसलेस तो त्या अनुषंगाने होणाऱ्या परिणामास वैयक्तिक अगर संयुक्तिक जबाबदार राहणार नाही.

१४) <u>न्यासाचा निधी व विनियोग :—</u>

<u>न्यासासाठी खालील मार्गाने निधी गोळा करण्यात येईल.</u>

या न्यासासाठी उत्पन्नाचे मार्ग देणगी, स्थावर मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न, भाडे उत्पन्न, पेटी फंड, ठेवीवरील व्याज, इतर न्यासांकडून मिळणारी मदत, सांस्कृतिक कार्यक्रम अगर स्मरणिका प्रकाशनापासून मिळणारे उत्पन्न, क्रिडा स्पर्धांतून मिळणारे उत्पन्न, न्यासाच्या विविध उपक्रमातून मिळणारे उत्पन्न आणि वैद्यकीय सेवेतून मिळणारे उत्पन्न या व अशा सर्व बाबींचा समावेश असेल. तसेच न्यासाची

2-9-2024

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

सभासद वर्गणी, देणग्या, सरकारी, निमसरकारी अनुदान, कायदेशीर मार्गाने व्याजी व बिनव्याजी कर्ज तसेच विश्वस्त मंडळास मान्य असलेल्या अटींवर देणग्या स्विकारता येतील. मात्र तशा पावत्या देणगीदारांना दिल्या पाहिजेत. न्यासाच्या उद्देशांना अनुसरुन विशिष्ट कारणासाठी वेगवेगळया प्रकारचे निधी (फंडस्) उभारता येतील. ज्या कारणासाठी निधी जमा करण्यात येईल त्याच कारणासाठी सदरचा निधी वापरला पाहिजे. विश्वस्त मंडळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६अ मधील तरतुदींचे पालन करेल.

१५) कर्ज संबंधीची तरतुद :–

न्यासाला कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. विश्वस्त मंडळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६अ मधील तरतुदींचे पालन करेल.

१६) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे संबंधीची तरतुद :–

न्यासास योग्य वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल. विश्वस्त मंडळाने उद्देशपूर्तीसाठी स्थावर मालमत्ता, शेतजमिनी, घरे विकत घेणे, घरे विकत देणे, बांधून देणे, भाडयाने देणे, स्थावर मिळकतीची विक्री करावयाची असल्यास अथवा गहाण ठेवणेची असेल तर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६ अन्वये मा. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर यांची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१७) बॅंक व्यवहार :–

न्यासाकडील शिल्लक रक्कम पोष्टात, सेव्हींग खात्यात अगर मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मान्यता दिलेल्या बॅंकेत ठेवावी अगर गुंतवावी. अशी सर्व खाती न्यासाच्या नावानेच उघडावीत. पण कोणत्याही खाजगी व्यक्तीकडे ती ठेव म्हणून ठेऊ नये. न्यासाचे बॅंकेतील आर्थिक व्यवहार अध्यक्ष व सचिव किंवा खजिनदार यापैकी एक या पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने करण्यात

PRINCI
SASCTK's, Institute of Physi
Taluka Kudal, District- Sindhudurg

यावेत. रुपये ५०००/– पेक्षा जास्त रक्कम कोणीही आपल्या हातात न ठेवता बँकेत जमा करावयाची आहे.

१८) सहीचा अधिकार :–

विश्वस्त मंडळाचे असणारी सर्व रक्कम, सर्व प्रकारचे निधी इ. गुंतवणूक आयकर कायदा १९६० मधील तरतुदीप्रमाणे व मुंबई सार्वजनिक विश्वस्त निधी कायदा १९५० च्या कलम ३५ चे तरतुदीस अधिन राहून करणेत येईल. अशी गुंतवणूक न्यासाचे नावे करणेत येईल. याकामी सहया करणे व अशा गुंतवणूकी मुदतीननंतर काढून घेणेचे सर्व व्यवहार विश्वस्त मंडळातील अध्यक्ष व सचिव किंवा खजिनदार यांचे संयुक्त सहीनेच करावयाचे आहे.

१९) सभासदांची यादी ठेवणीची पध्दत :–

न्यासाच्या सर्व सभासदांची यादी त्यांच्या अद्ययावत पत्यासह न्यासाच्या कार्यालयात ठेवणेत येईल व ती सभासदांना माहितीस्तव उपलब्ध करुन देणेत येईल.

२०) विश्वस्तांनी केलेल्या खर्चाची परतफेड :–

विश्वस्तांपैकी कोणाही विश्वस्ताने न्यासाच्या उद्देश पूर्तीसाठी स्वत:चा खर्च केला असेल तर तो खर्च त्याला न्यासाच्या उत्पन्नातून वसूल करुन घेता येईल. तसेच विश्वस्तांच्या निष्काळजीपणामुळे न्यासास नुकसान झाले असेल तर त्याची नुकसान भरपाई संबंधीतांकडून वसूल करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

२१) नोकर वर्ग :–

न्यासाच्या व्यवस्थेसाठी आवश्यकतेनुसार मॅनेजर, अकाऊटन्ट, कारकून सुरक्षा रक्षक, शैक्षणिक कर्मचारी, पुजारी, शिपाई व इतर सेवक वर्ग नेमण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील. नोकरांना मेहनताना, सेवा सुविधा, भत्ते निश्चित करणे. सेवकांना कामावरुन कमी करणे अथवा त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे

2.8.2024

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

इत्यादी बाबतचे अधिकार विश्वस्त मंडळास असतील. नोकर वर्गाचा पगार रोखीने अगर चेकद्वारे अदा केला जाईल. न्यासाच्या कोणाही नोकरास न्यासाच्या जागेत विश्वस्त मंडळाच्या पूर्व परवानगी शिवाय राहता येणार नाही.

विश्वस्त मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना, सल्लागार समिती, उपसमिती सदस्यांना विश्वस्त मंडळाच्या सभेत प्रस्ताव मांडून मानधन/मेहनताना दिले जाईल. असे मानधन त्या त्या सभेत ठरविले जाईल. विश्वस्त मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना, सल्लागार समिती, उपसमिती सदस्यांना दिले जाणारे मानधन समान असावे. एखादा विश्वस्त, विश्वस्त मंडळाचा पदाधिकारी असताना एखाद्या सल्लागार अथवा उपसमितीचा सदस्य असेल तर किंवा एकाहून अधिक समित्यांत असेल तर त्याला एकाच ठिकाणचे मानधन / मेहनताना दिला जावा.

## २२) स्थावर व जंगम मिळकतींचे रजिस्टर :—

स्थावर व जंगम मिळकतीची नोंद करणेसाठी स्वतंत्र रजिस्टर्स ठेवण्यात येईल. त्यामध्ये खरेदी, देणगी संपादित केलेल्या मिळकतींची नोंद ठेवण्यात येईल. विक्री केलेल्या वस्तुंची नोंद कमी करुन, तसेच मालमत्तेत होणारी वाढ अगर घट दरवर्षी नोंद घेऊन सदरचे रजिस्टर नेहमी अद्ययावत ठेवण्यात येईल. रजिस्टर प्रमाणे सर्व मिळकतींची रुजवात वर्षातून एक वेळ घेण्यात येईल. स्थावर व जंगम मिळकतीत होणाऱ्या वाढीला अगर त्रुटीचा बदल वेळेत व विहीत नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांना विश्वस्त मंडळ सादर करील.

## २३) सभा नोटीस वही व सभा वृत्तांत नोंदवही (मिनिटबुक) :—

विश्वस्त मंडळाच्या सभेसाठी नोटीस वहया ठेवण्यात येतील. त्यामध्ये सभेची तारीख, सभेसाठीचे विषय, ठिकाण व कोरम याबाबतची स्पष्ट सुचना लिहीणेत यावी. सभेची नोटीस अध्यक्षांच्या अनुमतीने सचिवांच्या सहीने काढावी. सभा वृत्तांत नोंदवहीमध्ये सभा नोटीसीप्रमाणे क्रमवार विषय घेऊन त्या सभांमध्ये घडलेल्या घटनांचा यथार्थ वृत्तांत लिहीणेत यावा. सदरचा वृत्तांत त्या पुढील सभेत वाचून कायम केल्यांनंतर सभेचे अध्यक्ष सदर सभा वृत्तांत मंजूर झाल्याबद्दलची सही

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

करतील. विश्वस्त मंडळास योग्य वाटल्यास सदर सभा वृत्तांतामध्ये बदल करण्याचा अगर रद्द करणेचा अधिकार राहील.

२४) महत्वाची कागदपत्रे :—

न्यासाची सर्व महत्वाची कागदपत्रे व दस्तऐवज सुरक्षित ठिकाणी म्हणजेच कुलूप असलेल्या कपाटात, बँकेतील लॉकरमध्ये अगर विश्वस्त मंडळाला योग्य वाटेल त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात यावे. न्यासाच्या सर्व महत्वाच्या दस्तऐवजांची नोंद घेण्यासाठी एक नोंदवही ठेवण्यात यावी. त्या नोंदवहीमध्ये सर्व महत्वाच्या दस्तऐवजांची नोंद करण्यात यावी. न्यासाचे सर्व दस्तऐवज टिकून रहावीत, त्यांना वाळवी लागू नये याकरीता योग्य ती सर्व खबरदारी घ्यावी.

२५) न्यासाच्या स्थावर मिळकतीची डागडुजी :—

विश्वस्त मंडळाने न्यासाच्या सर्व स्थावर मिळकती सुव्यवस्थित ठेवाव्यात. वेळोवेळी जरुर ती दुरुस्ती व डागडुजी करावी. आवश्यकता असल्यास विमा उतरवावा आणि त्यासाठी द्यावा लागणारा आकार न्यासाच्या उत्पन्नातून द्यावा. कोणत्याही स्थावर मिळकतीच्या दुरुस्तीसाठी अथवा नवीन बांधकाम करण्यासाठी रुपये १०,०००/— पेक्षा जास्त खर्च करावा लागणार असेल तर विश्वस्त मंडळाने निविदा मागवणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारचे काम जर विश्वस्त मंडळ स्वतःच्या देखरेखीखाली किंवा एखांदा विश्वस्त किंवा काही विश्वस्त मिळून करणार असेल तर त्यासाठी निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. तसेच विश्वस्त मंडळापैकी कोणीही किंवा एकाहून अधिक विश्वस्त न्यासास आवश्यक सामुग्री, यंत्रसामुग्री, इतर वस्तू मूल्याच्या मोबदल्यात (न्यासास विक्रीद्वारे) पुरवू शकतो पण त्यास विश्वस्त मंडळाची परवानगी आवश्यक आहे.

२६) देणगीदारांची यादी ठेवणेची पध्दत :—

न्यासाच्या सर्व देणगीदारांची यादी एका पक्क्या नोंदवहीत ठेवण्यात येईल. 'सदर वहीमध्ये देणगीदारांची पूर्ण नावे, पत्ते यांची नोंद ठेवून ती न्यास

८५
२९.२५

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

कायमान्वये मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांचेकडे दरवर्षी सादर करण्यात येईल.

२७) करार :—

न्यासाच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी विश्वस्त मंडळ न्यासासाठी स्थावर व जंगम मिळकत खरेदी, भाडयाने, भाडेपट्टयाने, देणगीने अगर अन्य प्रकाराने घेऊ शकेल. या व्यतिरिक्त स्थावर मिळकत भाडेपट्टयाने देणे, विक्री करणे, गहाण ठेवणे, बक्षीस देणे, अदलाबदल करणे अथवा अन्य कायदेशीर मार्गाने हस्तांतरीत करणे, विकसित करणे याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३६ मधील तरतुदीन्वये पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. अशाप्रकारे द्यावयाच्या किंवा घ्यावयाच्या मिळकतीची किंमत, भाडयाची रक्कम ठरविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील. तसेच तसे करार करणे व रद्द करणेचे अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

२८) विसर्जन :—

कोणत्याही कारणाने न्यासाचे विसर्जन करणेची स्थिती निर्माण झालेस तर सर्व विश्वस्त मंडळ सदस्यांना १० दिवस अगोदर नोटीस देऊन सभेस उपस्थित राहणेबाबत कळविणेत येईल व न्यास विसर्जन करणेचा ठराव उपस्थित विश्वस्तांच्या ३/५ मताने ठराव पारीत करावा लागेल. अशा सभेसाठी किमान २/३ विश्वस्त मंडळ सदस्यांची उपस्थिती आवश्यक राहील. तसेच सदर विसर्जनचा ठराव हा वार्षिक सर्वसाधारण अथवा विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ३/५ मताने मंजूर होणे आवश्यक आहे.

जर काही कारणाने आवश्यक उपस्थिती नसेल तर सभा तहकूब करुन परंत ०५ दिवसांची नोटीस देऊन सभा बोलवावी लागेल व अशा सभेमध्ये बहुमताने विसर्जनबाबत केलेला ठराव ग्राहय समजणेत येईल.

न्यास विसर्जन करणेपूर्वी सर्व देणे, घेणे, आर्थिक व्यवहार पूर्ण करावे लागणार न्यासाची स्थावर, जंगम, शिल्लक मालमत्ता समान उद्देश असलेल्या

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

2-9-'04

नोंदणीकृत न्यासास/संस्थेस/संघटनेस दान देणगी म्हणून देता येईल. याबाबत मा. धर्मादाय उप आयुक्त/धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शन/आदेशानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

२९) लाभार्थी :—

न्यासाच्या विविध उद्देश पूर्तीचा लाभ समाजातील सर्व स्तरावरील घटकांसाठी दिला जाईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे जात, पात, धर्म, वर्ण इत्यादींना भेदभाव केला जाणार नाही.

३०) अपरिवर्तनीयता ( Irrevocability ) :—

न्यास कोणाही एका व्यक्तीस रद्द करता येणार नाही. तसेच न्यासाच्या मालमत्तेचा ताबा अथवा नियंत्रण कोणीही एका व्यक्तीकडे राहणार नाही. यानुसार सदरचा न्यास हा अपरिवर्तनीय (Irrevocability) राहणेचा आहे.

३१) एकत्रीकरण :—

या न्यासाच्या उद्देशाशी समान नियम व उद्देश असलेल्या अन्य न्यासाशी या न्यासाचे मुळ उद्देश राखून एकत्रीकरण करण्याची मुभा विश्वस्त मंडळास राहील. तथापि, प्रचलित कायद्याप्रमाणे करावी लागणारी सर्व कार्यवाही विश्वस्त मंडळाने केली पहिजे.

३२) योजनेमधील बदल :—

योजनेतील कोणत्याही नियमांत अगर न्यासाच्या नावामध्ये काही बदल अगर दुरुस्ती करावयाची असल्यास न्यासाच्या विश्वस्त मंडळाच्या सभेत तसा बदलाचा ठराव मांडणेत येऊन करावयाच्या बदलांस अगर दुरुस्तीस बहुमताने मंजूरी घेणेत यावी. दुरुस्तीचा मसुदा न्यासाच्या विश्वस्त मंडळाच्या सभेत मंजूर झाले नंतर मे. साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०अ(३) प्रमाणे विहीत

धर्मादाय आयुक्त ... सिंधुदुर्ग

2.9.21

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg

नमुन्यात मंजुरीसाठी सादर करावेत व त्यांच्या मंजुरीनंतरच योजनेतील बदल अमलात आणण्यात येतील. तसेच मे. साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग हे विश्वस्तांना नवी नोटीस देऊन योजनेतील कलमांमध्ये स्वयंखुद्द दुरुस्ती करु शकतील.

**३३) मे. साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांचा निर्णय हा या योजनेच्या संदर्भात अंतीम निर्णय :—**

या योजनेमधील काही बाबींबद्दल अर्थाच्या दृष्टीने काही वाद निर्माण झाल्यास किमान दोन विश्वस्तांनी अगर हितसंबंधीतांनी मे. साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांचेकडे नियमाप्रमाणे अर्ज करावा. मे. साहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांचा त्यावरील निर्णय अंतीम व निर्णायक राहील.

2.9.2021

(एम. एस. निकम)
साहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

ठिकाण : सिंधुदुर्गनगरी
दिनांक : ०२.०९.२०२१

साहाय्यक धर्मादाय आयुक्त सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

खरी प्रत
2/9/2021
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

PRINCIPAL
SASCTK's, Institute of Physiotherapy, Kasal
Taluka Kudal, District- Sindhudurg